**<u>ठळक बातम्या</u>**

- सत्यसाईबाबा यांचं जन्मशताब्दी वर्ष जागतिक शांतता, प्रेमाचं महापर्व असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- बिहारमध्ये नितीश कुमार यांची संयुक्त जनता दलाच्या तर सम्राट चौधरी यांची भाजपच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी निवड

- माजी प्रधानमंत्री दिवंगत इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आज देशभरातून आदरांजली

**आणि**

- आंध्रप्रदेशात आज सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत सहा ते सात नक्षली ठार

**<><><><><>**

सत्यसाईबाबा यांचं जीवन वसुधैव कुटुंबकम याचं उदाहरण आहे. त्यामुळे त्यांचे हे जन्मशताब्दी वर्ष जागतिक शांतता, प्रेमाचं महापर्व असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज काढले. आंध्र प्रदेशातल्या पुट्टपर्थी इथं श्री सत्यसाईबाबा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सत्य साई बाबा यांच्या सन्मानार्थ काढलेल्या विशेष नाण्याचं आणि टपाल तिकीटाचं प्रकाशन झालं. सत्यसाईबाबांनी अध्यात्माला जनसेवेशी जोडले. मानव सेवा ही माधव सेवा आहे अशी त्यांची धारणा होती आणि आजही त्याच धारणेनं त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरून कार्य सुरू असल्याचं गौरवोद्गार प्रधानमंत्र्यांनी काढले.

**- - होल्ड... बाईट - प्रधानमंत्री - -**

प्रधानमंत्री मोदी यांचं आज सकाळी आंध्र प्रदेशातल्या पुट्टपर्थी विमानतळावर आगमन झालं. त्यावेळी मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री के. पवन यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर प्रधानमंत्री प्रशांती निलयम इथल्या श्री सत्य साईबाबा यांच्या समाधीस्थळी पूजा केली. आणि तिथं काही काळ ध्यानधारणा केली. गोदानम्

कार्यक्रमाअंतर्गत चार शेतकऱ्यांना प्रधानमंत्र्यांनी त्यांनी गो-दान केलं. या कार्यक्रमाला प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चन यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रधानमंत्री तामिळनाडूच्या कोईम्बतूर इथं होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते पीएम-किसान योजनेच्या २१व्या हप्त्याचं वितरण केलं जाणार असून या अंतर्गत नऊ कोटी शेतकऱ्यांना मदत दिली जाणार आहे. आतापर्यंत पीएम- किसान योजनेअंतंग ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना  ३ लाख ७० हजार कोटी रुपयांहून अधिक आर्थिक मदत दिल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिली.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सातवी अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली. २०२६-२७ च्या आगामी अर्थसंकल्पाच्या अनुषंगानं त्यांनी बँकिंग, वित्त सेवा आणि विमा क्षेत्रातल्या तज्ञांशी चर्चा केली. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरीही या बैठकीला उपस्थित होते. अर्थमंत्र्यांनी काल स्टार्ट अप परिसंस्था आणि भांडवली बाजारातील भागधारकांसोबत बैठक घेतली.

<><><><><>

बिहारमध्ये नितीश कुमार यांची संयुक्त जनता दलाच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी निवड झाली आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नवनिर्वाचित आमदारही आज विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड करणार आहेत. यातही नितीश कुमार यांचं नाव आघाडीवर असून ते आज सरकार स्थापनेचा दावा करतील. सध्याच्या २४३ सदस्यांच्या विधानसभेचा कार्यकाळही आज संपणार आहे. भाजपा नवनिर्वाचित आमदारांचीही आज बैठक झाली. यात सम्राट चौधरी यांची भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाली, तर विजय कुमार सिन्हा यांची उपनेतेपदी निवड करण्यात आली.

दरम्यान, पाटण्याच्या ऐतिहासिक गांधी मैदानावर मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू आहे. या सोहळ्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, रालोआशासित राज्यांचे मुख्यमंत्री तसंच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

छत्तीसगडमधे मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण प्रक्रिया सुरू आहे. या अंतर्गत ४ नोव्हेंबरपासून राज्यातल्या ९९ टक्के नागरिकांना नोंदणी अर्ज देण्यात आले आहेत. बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदारसंघात अर्ज द्यायला आणि जमा करायला जात आहेत. तसंच जमा केलेल्या अर्जांचं डिजिटायजेशन केलं जात असून आतापर्यंत २७ लाख अर्जांचं डिजिटायजेशन करण्यात आलं आहे.

<><><><>

माजी प्रधानमंत्री दिवंगत इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आज देशभरात आदरांजली वाहिली जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इंदिरा गांधी यांना समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही इंदिरा गांधी यांना आंदराजली वाहिली.

<><><><>

आंध्रप्रदेशातल्या रामपाचोदावरम इथं आज सकाळी सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत सहा ते सात नक्षली मारले गेले. यात काही वरिष्ठ नक्षली नेत्यांचा समावेश असल्याचं गुप्तचर विभागाचे अतिरिक्त महासंचालक महेश चंद्र लड्‌डा यांनी वार्ताहरांना सांगितलं. एनटीआर, कृष्णा, काकिनाडा, एलुरू या जिल्ह्यांमधून जवळपास ५० नक्षलींना अटक केली असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटकं आणि शस्त्रं जप्त करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, आंध्रप्रदेशात छत्तीसगड सीमेवर काल झालेल्या चकमकीत वरिष्ठ नक्षली नेता हिडमा मडावी मारला गेला.

<><><><>

पासपोर्ट सेवा कार्यक्रमा अंतर्गत २०३५ पर्यंत ई पासपोर्टचं ट्रानिशन पूर्ण करण्याचं काम केंद्र सरकार करत आहे. यानुसार नव्याने दिलेला पासपोर्ट ई पासपोर्ट होईल, तसंच सध्याचा बिगर इलेक्ट्रॉनिक पासपोर्ट त्याची मुदत संपेपर्यंत वैध असेल. ई पासपोर्टमधे इंटरलॉकिंग मायक्रोलेटर, रिलीफ टिन्ट्स, आणि रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेन्टीफिकेशन चिपसह इतर सुरक्षा प्रणाली असेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या कौन्सलर आणि डायस्पोराचे सचिव अरुण कुमार चॅटर्जी यांनी सांगितलं.

<><><><>

भारताचा ५६वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फी उद्यापासून गोव्यात पणजी इथे सुरू होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधल्या २४० चित्रपटांचा समावेश असेल. द ब्लू ट्रेल या चित्रपटाने या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. गोव्यात मडगाव इथे रवींद्र भवनात हा चित्रपट दाखवला जाईल. येत्या २८ तारखेपर्यंत हा महोत्सव सुरू असेल.

<><><><>

देशभरातल्या न्यायाधिकरणांच्या सदस्यांच्या नियुक्ती, कार्यकाळ आणि सेवाशर्तींशी संबंधित अनेक तरतुदी आज सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्या. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या पीठाने हे आदेश दिले आहेत. २०२१च्या न्यायाधिकरण सुधारणा कायद्यात केंद्राने किरकोळ बदल करून या तरतुदी पुन्हा लागू केल्या होत्या. या तरतुदी वादग्रस्त असून त्या अधिकारांच्या विकेंद्रीकरणाच्या तसंच न्यायालयीन स्वातंत्र्याच्या तत्वांचं उल्लंघन करत असून या तरतुदी पुन्हा आणल्या जाऊ नयेत, असं न्यायालयाने यावेळी नमूद केलं.

<><><><>

कोलंबो सुरक्षा परिषदेच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांची सातवी बैठक नवी दिल्लीत उद्या होणार आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल मालदीव, मॉरीशस, श्रीलंका आणि बांगलादेशाच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचं स्वागत करतील. सेशेल्स निरीक्षण म्हणून उपस्थित राहणार असून मलेशियाला अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलं आहे.

<><><><>

ग्रेटर नोएडा इथे शहीद विजय सिंह पाठक क्रीडा संकुलात सुरू असलेल्या जागतिक मुष्टीयुद्ध स्पर्धा २०२५ मध्ये महिलांच्या गटात भारताच्या अरुंधती चौधरी हिनं जर्मनीच्या लिओनी मुलर हिला पराभूत केलं. तर मिनाक्षी, अंकुश फांगळ, प्रवीण आणि नुपूर यांनी त्यांच्या गटात उत्तम कामगिरीची नोंदवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><>

फिफा विश्व चषक फूटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरणारा कुराको हा जगातला सर्वात लहान देश ठरला आहे. जमैकाविरुद्धचा सामना अनिर्णित राहिल्यामुळे कुराको फिफा विश्व चषक स्पर्धेसाठी पात्र ठरला. सामन्याच्या उत्तरार्धात जमैकाला सामना जिंकण्याची संधी होती. मात्र कुराकोच्या बचावामुळे त्यांना ही संधी साधता आली नाही.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येतील प्रमुख आरोपी गँगस्टर अनमोल बिश्नोई याला आज अमेरिकेतून भारतात परत आणण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आज दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. एप्रिल २०२४ मध्ये अभिनेता सलमान खान याच्या निवासस्थानी झालेल्या गोळीबार प्रकरणातही बिश्नोई हा एक आरोपी आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागाने आज अंदमान आणि निकोबार द्वीपसमूह, लक्षद्वीप, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल इथे मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसंच, आंध्र प्रदेश, केरळ आणि माहे इथे काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहतील. मध्य महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात मात्र आज थंडीची लाट येण्याची शक्यता असून दक्षिण केरळची किनारपट्टी, मन्नारचं आखात, आग्नेय तसंच पूर्व मध्य बंगालच्या उपसागरानजीकच्या भागात वादळी वारे वाहतील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**